दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ५२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.२३ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्य सरकारकडून पेट्रोल, डिझेल दरात कपात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

केंद्र सरकारनं काल पेट्रोल डिझेलवरील अबकारी कर कमी केल्यानंतर आता राज्य सरकारनंही सर्वसामान्यांना दिलासा दिला आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकारने त–ढ कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाने पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर कमी केल्यानंतर राज्य शासनाने देखील आजपासून पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित करात (त–ढ) अनुक्रमे २ रुपये ८ पैसे आणि १ रुपया ४४ पैसे प्रती लिटर कपात केली आहे. यामुळे राज्याच्या तिजोरीवर वर्षाला सुमारे २५०० कोटी रुपये भार पडणार आहे.

केंद्र सरकारने काल मोठा निर्णय घेतला. पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर कमी करण्याच्या केंद्राच्या निर्णयाने पेट्रोलचा दर ९.५० पैसे आणि डिझेलचे दर ७ रुपयांनी कमी झाला. केंद्र सरकारनं



कर कमी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकारने देखील यासंदर्भात निर्णय घ्यावा अशी मागणी सर्वसामान्यांमधून जोर धरु लागली होती. अखेर ठाकरे सरकारनंदेखील सर्वसामान्यांच्या मागणीला प्रतिसाद देत पेट्रोल डिझेलवरील त–ढ कमी करण्याचा निर्णय घेतला.

व्हॅट कपातीमुळे मुंबईत पेट्रोलचा दर १०९.२७ रुपयांवर आला आहे. तर एक लीटर डिझेलसाठी ९५.८४ रुपये मोजावे लागणार आहेत. पुण्यात पेट्रोलचा दर ११०.८७ रुपयांवर, तर डिझेलचा दर ९५.३६ रुपयांवर आला आहे. औरंगाबादेत पेट्रोलचा दर ११२.९९ रुपये आहे. तर डिझेलचा दर ९८.९१ रुपये आहे. नाशकात एक लीटर पेट्रोलसाठी १११.७३ रुपये, तर डिझेलसाठी ९६.१९ रुपये मोजावे लागत आहेत. तर नागपुरात पेट्रोलचा दर १०९. ७३ रुपये, तर डिझेलचा दर ९५.४२ रुपये इतका आहे.

केंद्र आणि राज्याने कमी केलेल्या करामुळे दोनच दिवसांत पेट्रोल आता ११ रुपये ५८ पैशांनी स्वस्त झालं आहे. तर डिझेल ८ रुपये ४४ पैशांनी स्वस्त झालं आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्णयाने महागाईच्या वणव्यात होरपळणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळालेला आहे.

# आंबेनळी घाटाचे म्हणजेच फिटझगेराल्डचे रूंदीकरण होण्याची गरज



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील पोलादपूर ते महाबळेश्वर दरम्यान सुमारे ३२ कि.मी. अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वशृत आंबेनळी घाट पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्द येथून सुरू झाला आहे. ब्रिटीशांनी या घाटाला फिटझगेराल्ड असे संबोधिले होते. गेल्यावर्षी २०२१च्या अतिवृष्टी व भुस्खलनामुळे या घाटाची वाताहत होऊन तात्पुरती दुरूस्ती करण्यात आली आहे. मात्र, नजिकच्या काळात पोलादपूर वाई सुरूर या राज्यमार्गाचे रूंदीकरण होण्यासोबतच आंबेनळी घाटाचे म्हणजेच फिटझगेराल्डचे रूंदीकरण होण्याची गरज निर्माण झाली आहे.

पूर्वी शिवकाळात महाबळेश्वरपर्यंत अथवा त्याहीपुढे जाण्यासाठी महाडच्या अग्नेय दिशेने माझेरी, वरंध, शिवथरघळ, पिंपळवाडी असा २४ कि.मी.चे सह्याद्री पर्वतराजीतून मार्गाक्रमण करून पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर गाव–ाजवळ पार घाट सुरू होत असे. या मार्गाला आजही छ.शिवाजी महाराज रस्ता म्हटले जाते. त्याकाळी महाड ही तरत्या बंदराची उतारपेठ होती. महाड तालुक्याला पोलादपूर पेटयाचा मुलूख १९४८ सालापर्यंत जोडला होता. ब्रिटीशांनी पोलादपूरला महाल कचेरी ठेवली होती. पण तत्पूर्वी १८२६ पर्यंत पार घाट हाच शिवकालीन मार्ग सातारा, वाई, कराडपर्यंत वाहतूकीसाठी वापरात येत होता. मात्र, आजचे थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर शिवकाळात दंडकारण्यातील श्रीक्षेत्र महाबळेश्वर असे परिचित होते. पार घाटातून १८२६ पूर्वी महाबळेश्वरला जाणारी पायवाट होती.

१८२६ पर्यंत पार घाट हाच शिवकालीन मार्ग वाहतूकीसाठी वापरात येत असताना पारघाटाला रडतोंडीचा घाट हा पर्यायी मार्ग होता.याखेरिज, भोर संस्थानापासून कामथे आणि ढवळे घाट वाटसरूंसाठी वापरात होते. मात्र, हा घाट दूर्गम व अवघड असल्याने येथून मालवाहतूक कठीण होती. सातारा, वाईशी कमी अंतरात पोहोचण्याचा हा मार्ग बिकट तर होताच पण या मार्गाची डागडुजी, देखभाल दुरूस्ती करण्यासाठी खुपच खर्च झाला.

ब्रिटीशांना घोडागाडी अथवा मोटारगाडीसाठी उपयुक्त मार्ग तयार करण्याची आवश्यकता भासू लागल्याने पार घाटाच्या उत्तरेस ०.८१ कि.मी. अंतरावर कापडे खुर्द गावाजवळ नव्याने घट बांधला. या घाटाला फिटझगेराल्ड म्हणत. हाच सध्याचा आंबेनळी घाट होय. या घाटाच्या उभारणीस १८७१ साली सुरूवात होऊन केवळ ४ लक्ष ४४ हजार रूपये खर्च झाला. हा घाट पाचच वर्षात वाहतुकीस खुला होऊन १८७६ सालापासून ब्रिटीश आणि व्यापारी घोडयाला लगाम न लावता कापडे खुर्दपर्यंत उतरत असत. या घाट उभारणीच्या काळातच श्रीक्षेत्र महाबळेश्वरचा गिरिस्थान थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटीशांनी विकास केला.

ब्रिटीशांनी पुर्वीचा रडतोंडीचा घाट आणि पारघाट यामधून फिटझगेराल्डची बांधणी केली आणि याचदरम्यान पोलादपूर तालुक्यातील सातारा रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमेवरील कुडपण आणि सातारा जिल्ह्यातील श्रीक्षेत्र महाबळेश्वर या दोन थंड हवेच्या ठिकाणांपैकी श्रीक्षेत्र महाबळेश्वरचा हिलस्टेशन म्हणून विकास केला. यावेळी सक्तमजुरीच्या शिक्षेवर कैद्यांचा फिटझगेराल्ड आणि महाबळेश्वर हिलस्टेशनच्या उभारणीमध्ये श्रमसहभाग ब्रिटीशांनी वापरला. यानंतर आंबेनळी घाट म्हणून स्वातंत्र्यानंतर या घाटरस्त्याला ओळखले जाऊ लागले आणि महाड सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हा रस्ता वर्ग करण्यात आला.

२२ जुलै २०२१ रोजी रात्रभर अतिवृष्टी आणि भुस्खलनामुळे पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्दपासून वरील भागात म्हणजे ब्रिटीशकालीन फिटझगेराल्ड घाटाच्या सुरूवातीपासूनच दरडी कोसळून राज्यमार्ग दरीमध्ये वाहून गेला आणि ठिकठिकाणी वाहने घेऊन जाणे सुमारे महिनाभर तरी अशक्य झाले होते. मोटारसायकलस्वारांनी जीव मुठीत घेऊन पोलादपूरपर्यंत वाहने आणल्यानंतर थोडाफार शिल्लक असलेल्या घाटरस्त्याच्या डागडुजीचे काम हाती घेण्याची गरज निर्माण झाली. ज्याठिकाणी सातारा जिल्ह्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला शक्य नव्हते तिथे महाड विभाग आणि पोलादपूर उपविभागामार्फत घाटरस्ता .../२

# पालीत सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीत विकासाच्या नावाची बोंबाबोंब दिसून येते, पालीत अत्यंत महत्वाचा प्रश्न व समस्या जन–तेला सतावते आहे. सद्यस्थितीत सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा आहे, त्यामुळे महिला व नागरिकांची कुचंबना होताना दिसून येतंय. येथे मूलभूत व पायाभूत सेवा सुविधांचे बारा वाजलेत तर नेते, लोकप्रतिनिधी, प्रशासन यांचा बोलाचा भात अन बोलाची कडीच दिसून येते. पालीत सार्वजनिक स्वच्छतागृहाभावी महिला, युवती विद्यार्थिनीची प्रचंड कुचंबना होत आहे, नैसर्गिक विधी करायचा कुठे, महिला पुरुषांची अक्षरश तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी परिस्थिती होतेय.

शनिवार ,रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी पाली शहर गजबजलेले असते. सुधागड तालुक्यातील व तालुक्याबाहेरील नागरीक रोजची खरेदी, शासकीय कामे करण्यासाठी तसेच विद्यार्थी शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी , रुग्ण दवाखान्यासाठी पालीत येतात. तसेच तीर्थक्षेत्र असल्याने असंख्य भाविक देखील पालीत नियमित येत असतात. मात्र बाजारात फिरतेवेळी किंवा कुठे जातांना नैसर्गिक विधी करायचा झाल्यास कुठे जावे हा प्रश्न त्यांना पडतो. कारण पालीत कुठेच सार्वजनिक स्वच्छतागृह किंवा मुताऱ्या नाही आहेत. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी परिस्तिती अनेकांची होते. विशेषतः यामध्ये महिलांची अक्षरशः कुचंबना होते. अष्टविनायकापैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत ठिकठिकाणी सार्वजनिक स्वछतागृह नाहीत ही खूप मोठी समस्या आहे.पालीत सुचे वांदे झाले आहेत. स्वच्छतागृहाअभावी शासकीय कामांसाठी किंवा खरेदीसाठी बाजारात आलेले नागरिक व भाविक यांची खूप कुचंबना होत आहे. त्यामुळे पालीत महत्वाच्या ठिकाणी तसेच नाक्यांवर सार्वजनिक स्वच्छतागृह व मुताऱ्या बांधाव्यात अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रश्नाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी संवेदनशील भावनेने पाहिलं का? व ही समस्या सोडवली जाईल का? हा खरा सवाल आहे.

स्वच्छता गृहाची उपलब्दता नसल्याने नागरिकांना अक्षरशः पोट दाबूनच त्यांना हा त्रास सहन करावा लागतो. ज्या व्यापाऱ्यांच्या दुकानात स्वच्छतागृह नाहीत त्यांची देखील गैरसोय होते. मधुमेह व मुतखडा असलेल्या लोकांना सुध्दा .../२



## संक्षिप्त...

### पतीने केला पत्नीच्या हत्येचा प्रयत्न, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**


मॉल मध्ये का घेऊन गेली या कारणावरून देवीचा पाडा, पाटीलवाडी येथे राहणाऱ्या पत्नीवर पतीने लोखंडी सळई व फायबरच्या दांड्याने बेदम मारहाण करून हत्येचा प्रयत्न केला. या प्रकरणी आरोपी पतीविरोधात तळोजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हफिजूल रमजान खान (वय २८) या त्यांचे पती रमजान खान, मुलगी व मुलगा यांच्यासह देवीचापाडा, पाटीलवाडी येथे राहतात. रमजान यांचा भंगार विक्री खरेदीचा व्यवसाय असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत. १९ मे रोजी सर्वजण गाडीची सर्व्हिसिंग करण्यासाठी कल्याण, शहाड येथे गेले होते.

याठिकाणी वेळ लागेल म्हणून हाफिजुल हिने रमजान याला कल्याण येथील मेट्रो मॉलमध्ये जाऊ असे म्हटले. मॉलमध्ये गेल्यावर रमजान हा पत्नी सोबत भांडू लागला. घरी परत येते ळी रमजान याने गाडीमध्येच पत्नीला सळई व फायबरच्या दांड्याने मारहाण केली. व तो तिला घरी घेऊन आला. त्यानंतर घरी आल्यानंतर पुन्हा भांडण केले व फायबरच्या दांड्याने व लोखंडी सळईने संपूर्ण शरीरावर मारहाण केली.

यात हफीजुल खान जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर एमजीएम हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. त्यांच्या डाव्या पायाचे हाड फॅक्चर झाले असून डोक्याला सात टाके पडले आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जडण घडणीत रणरागिणीची भूमिका महत्वाची : सुनील तटकरे




**दै.रायगड नगरी । दिघी**

आगामी निवडणूकीत जिल्हात सर्वत्र निर्विवाद यश संपादित करण्याच्या दृष्टिकोनातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जोरदार तयारी केली आहे. गाव, नगरपरिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद सर्व निवडणुकीमध्ये महिला पदाधिकाऱ्यांना प्राधान्य दिले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीमध्ये महिला पदाधिकारी यांची भूमिका निर्णायक आहे असे प्रतिपादन रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांनी केले आहे.

सुतारवाडी येथील गीता बाग सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. सदर प्रसंगी उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांना खासदार सुनील तटकरे यांनी संबोधित केले. तटकरे म्हणाले आज मितीस रायगड जिल्ह्यातील प्रत्येक गावात राष्ट्रवादी च्या माध्यमातून विकास कामे केली जात आहेत. आपण केलेली विकास कामे तळागाळातील सर्वसामान्य व्यक्ती पर्यंत पोहोच करण्याचे दायित्व प्रत्येक कार्यकर्त्याची आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकारी वर्गाच्या यांच्या माध्यमातून आपण समाजातील महिलांच्या विविध प्रश्नांचे निराकरण केले आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या प्रश्नाचे सर्वतोपरी निराकरण करण्यासाठी आपला पक्ष सदैव तत्पर आहे. जिल्ह्या–तील तळागाळातील घटकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाविषयीं ममत्व आहे . आपुलकी आणि स्नेह आहे. राष्ट्रवादीच्या महिला पदाधिकार्यांनी पक्षाच्या अजेंडा, पक्षाची भूमिका सन्माननीय व्यक्तींपर्यंत पोहच केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आपणा सर्वांना आगामी काळामध्ये महिला प्रश्ना संबधी सजग भूमिका घेऊन समाजातील पिडीत शोषित महिलांना न्याय देण्याचे काम करायचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार साहेब यांनी महिला आरक्षणा बाबत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगिन विकासात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वाटा मोठा आहे असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

गतकाळातील पक्षाच्या संक्रमण काळाविषयी बोलत असताना तटकरे म्हणाले पाहिजे लोकसभेच्या निवडणुकीनंतर पक्षातील अनेक मातब्बर मंडळी पक्ष सोडून गेले मात्र शरद पवार साहेब यांनी पक्षाला नवसंजीवनी देत संपूर्ण महाराष्ट्राचा झंझावती दौरा केला. परिणाम स्वरूप महाराष्ट्रातील तरुण वर्ग राष्ट्रवादी पक्षाकडे आकर्षित झाला. मराठी अस्मितेचे तेज प्रज्वलित होऊन महाराष्ट्र मध्ये महा विकास आघाडी सरकारची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राला सुसंस्कृत राजकारणाचा आदर्श निर्माण करून गेलेला आहे. मात्र गेल्या काही .../२

# केंद्र सरकारच्या विरोधात रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने आंदोलन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

केंद्र सरकारच्या पेट्रोल–डिझेल, गॅस दरवाढी विरोधात रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

रायगड रायगड जिल्ह्याचे खासदार सु–नील तटकरे यांच्या आदेशानुसार, राज्याच्या राज्यमंत्री व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदीती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा उमा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच कोकण विभागीय महिला राष्ट्रवादी महिलाध्यक्षा अर्चना घारे यांच्या उपस्थितीत रोहा तालुक्यामध्ये केंद्र सरकारच्या पेट्रोल–डिझेल,गॅस दरवाढी विरोधात रायगड जिल्हा



राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी रायगड जिल्हा राष्ट्रवादी युवती संघटनेच्या अध्यक्षा सायली दळवी, कर्जत तालुकाध्यक्ष रंजना धुळे, रोहा तालुकाध्यक्ष प्रीतम पाटील,सुधागड तालुकाध्यक्षा रूपाली भणगे, मुरुड तालुकाध्यक्ष मृणाल खोत, खालापूर तालुकाध्यक्ष श्वेता मनवे, माणगाव तालुका अध्यक्ष संगीता बक्कम, श्रीवर्धन तालुकाध्यक्ष ज्योती पारकर, म्हसळा तालुकाध्यक्ष रेश्मा कानसे, महाड तालुकाध्यक्ष सुप्रिया देशमुख, तालुकाध्यक्ष हेमांगी पाटील, त्याच बरोबर रोहा शहराध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, .../२

# जेएनपीटी रस्त्यावर भरधाव वेगातील ट्रेलरला अपघात



**दै.रायगड नगरी । उरण**

धुतूम रस्त्यावरुन जेएनपीटी बंदराकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रेलरला अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात चालक गंभीररीत्या जखमी झाला आहे.

जेएनपीटी परिसरातील रस्त्यांवर सध्या बेधडक आडवी उभी वाहने पार्किंग करण्यात येत आहेत.त्यामुळे सदर वाहने ही अपघातास कारणीभूत ठरु पाहत आहेत. रविवारी सकाळी धुतूम रस्त्यावरुन जेएनपीटी बंदराकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील ट्रेलरने पागोटे गावाजवळील रस्त्यावर पार्किंग करणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात वाहन चालक गंभीररीत्या जखमी झाला आहे. तरी अपघातास कारणीभूत ठरु पाहणाऱ्या बेकायदा पार्किंगवर वाहतूक पोलीस यंत्रणेने कारवाई करावी अशी मागणी प्रवाशी नागरीक करत आहेत.

# कांदळवनांवरील अनधिकृत भरावांविरोधात कोळी समाजाचा एल्गार

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण किनारपट्टीवरील अलिबाग व मुरूड तालुक्यात समुद्राला येवून मिळणा–या खाडया बुजविण्याचे काम राजरोसपणे सुरू असूनही प्रशासनाकडून होणा–या दुर्लक्षामुळे जनतेमध्ये प्रचंड नाराजीची भावना निर्माण झाली आहे.

अलिबाग पाठोपाठ आता मुरूड तालुक्यातील ताराबंदर कोलमांडला येथील कांदळवनांवरील अनधिकृत भरावाविरोधात महादेव कोळी समाज ताराबंदर यांनी रेवदंडा पोलीसांत १० मे व १४ मे रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. तसेच शुक्रवारी( दि.२०–०५–२०२२) बोर्ली ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ताराबंदर खाडीलगत चालू असलेल्या अनधिकृत भराव तसेच कांदळवनाच्या कत्तली विरोधात ग्रामस्थ मंडळ ताराबंदर यांनी ग्रामविकास अधिकारी यांना निवेदन दिले तसेच कार्यवाहीची मागणी केली.

यावेळी सरपंच चेतन जावसेन, ग्रामविकास अधिकारी गाडेकर, ताराबंदर कोळी समाज अध्यक्ष वैभव भोईर, भालचंद्र वर्सोलकर, कृष्णा परदेशी, प्रशांत भोईर, राजेश तरे, .../२



# बदल घडविणारा निवाडा

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) परिषदेच्या शिफारशी केंद्र व राज्यांतील सरकारांना बंधनकारक नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडा जीएसटी परिषदेच्या रचनेवर परिणाम करणारा आहे. तो तसा नसल्याचा दावा केंद्रीय महसूल सचिवांनी केला असला, तरी तमिळनाडू, केरळ, छत्तीसगड आदी राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या प्रतिक्रिया पाहता, जीएसटीच्या निर्णय पद्धतीत बदल संभवतात. कायदेतज्ज्ञही हाच अर्थ काढत आहेत. दीर्घ काळ चर्चेत असलेला जीएसटी कायदा लागू करण्याचे धाडस दाखविल्याचा आणि त्याद्वारे क्रांतिकारी बदल केल्याचा दावा मोदी सरकार करीत आले आहे. तो चुकीचा नाही; परंतु 'एक देश, एक कर' या संकल्पनेवर; तसेच जीएसटी परिषदेतील निर्णय पद्धतीवर आणि करआकारणीबाबत राज्यांच्या अधिकारांचा संकोच होत असल्यावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संघराज्याच्या चौकटीशी आणि राज्यघटनेशी प्रामाणिक राहून या प्रश्नांना उत्तरे न देता 'जीएसटी'च्या विरोधकांवर राजकारण केले जात असल्याचा आरोप सरकारकडून होत गेला. वास्तविक, जीएसटी कायदा लागू केल्यापासूनच्या गेल्या जवळ जवळ पाच वर्षांत कररचनेत केलेले विविध बदल विरोधकांच्या प्रश्नांची सयुक्तता स्पष्ट करतात. जीएसटी परिषदेत केंद्रासह सर्व राज्यांतील अर्थ मंत्री असतात. त्यामध्ये सर्वांना सूचना मांडण्याचा वा अहसमती दर्शविण्याचा अधिकार असला, तरी परिषदेने घेतलेले निर्णय सर्व राज्यांना बंधनकारक असतात. विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांच्या सूचनांचा विचार होत नसल्याचा आणि केंद्र सरकार निर्णय लादत असल्याचा आरोप म्हणूनच होत होता. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालामुळे ही परिस्थिती बदलू शकते. जीएसटी परिषदेचे निर्णय राज्य सरकारे नाकारू शकतात. हा निवाडा देताना न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. सूर्य कांत आणि न्या. विक्रम नाथ यांच्या खंडपीठाने मांडलेले मत महत्त्वाचे आहे. संघराज्य व्यवस्था आणि केंद्र–राज्य संबंध यांचा उल्लेख त्यांनी केला आहे. केंद्र आणि राज्ये परस्पर सहकार्य करू शकतात; तसेच काही वेळा तसे होईलच असे नाही. राज्यघटनेत दुरुस्तीद्वारे २७९ ब कलम रद्द करून, २७९ (१) या कलमाचा समावेश करण्यात आला आहे. याचा अर्थ असा, की जीएसटी परिषदेद्वारे केंद्र सरकार राज्यांचे मतपरिवर्तन करू शकते. जीएसटी कायदा करण्यामागील हेतूही हाच मुद्दा अधोरेखित करतो; त्यामुळे केंद्र आणि राज्ये परस्परांवर अवलंबून असू शकत नाहीत, असे निकालात स्पष्ट करण्यात आले आहे. जीएसटी परिषदेत केंद्र आणि राज्यांनी सौहार्द राखायला हवे, असे नमूद करतानाच न्यायालयाने संघराज्य पद्धतीतील सहकाराचा मुद्दा मांडला आहे. न्यायालयाचा निकाल सुस्पष्ट असला, तरी यामुळे जीएसटीबाबत काय काय परिणाम होतात, हे पाहायला हवे. भारतीय जनता पक्षाचे सरकार नसलेल्या राज्यांनी याबाबत तातडीने प्रतिक्रिया दिल्या आहेत; कारण त्यांचा परिषदेच्या रचनेवर आणि कार्यपद्धतीवर आक्षेप होता. एक वैधानिक संस्था घटनात्मक हक्कांना दूर सारू शकत नाही, ही तमिळनाडूचे अर्थमंत्री पी. त्यागराजन यांची प्रतिक्रिया नेमकी आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यांच्या हक्कांचे संरक्षण केल्याचे केरळचे अर्थमंत्री के. एन. बालगोपालन यांनी म्हटले आहे. न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया न देऊन केंद्रीय अर्थमंत्रालयाने सावध भूमिका घेतली असली, तरी महसूल सचिवांचे विधान निवाड्याचे महत्त्व कमी करणारे आहे. केंद्र सरकार काहीही म्हणत असले, तरी हा निकाल बदल घडविणारा आहे, यावर तज्ज्ञांचेही एकमत आहे. हे बदल कसे होतात, त्यासाठीचे राजकारण कसे साकारते हे पाहावे लागेल. अनेक गोष्टी केंद्रीय स्तरांवरूनच करण्याच्या वाढत्या आग्रहावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची गरज या निकालातून अधोरेखित होते. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून हा प्रकार वाढला असला, तरी आधीच्या केंद्र सरकारांनीही काही बाबतीत केंद्रीकरणाची भूमिका घेतली होती. उदाहरणार्थ, 'एक देश, एक परीक्षा'. देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी एकच प्रवेश परीक्षा (नीट) असण्याची संकल्पना मांडून ती प्रत्यक्ष साकारण्यास आणि तिच्यावर सर्वोच्च न्यायालयाची मोहोर उमटविण्यास वेळ लागला हे खरे; परंतु पंधरा वर्षांपूर्वी त्याची सुरुवात झाली होती. या परीक्षेस तमिळनाडूने आक्षेप घेतला असून, तसा ठरावही विधिमंडळात मंजूर करून घेतला आहे. अलीकडेच केंद्र सरकारने पदवी प्रवेशासाठी 'सीयूईटी' ही एकच सामायिक परीक्षा असावी, असे म्हटले आहे. तूर्त तरी ही परीक्षा राज्य विद्यापीठांना बंधनकारक नाही; परंतु सर्व विद्यापीठांनी ती स्वीकारावी, अशी सूचना करण्यात आली आहे. हे केंद्रीकरण वरकरणी विद्यार्थ्यांच्या हिताचे वाटत असले, तरी प्रत्यक्षात राज्यांना संकुचित करणारे आहे. जीएसटीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यापासून केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी बोध घ्यावा आणि सर्व प्रकारच्या केंद्रीकरणाला आवर घालावा.

# कर्जत कबड्डी लीग २०२२ स्पर्धेचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका कबड्डी असोसिएशनच्या वतीने पहिल्या कर्जत कबड्डी लीग २०२२ स्पर्धेचा चा शुभारंभ करण्यात आला. तालुका मर्यादित ही स्पर्धा असून १२ संघांनी यामध्ये सहभाग घेतला आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेला क्रीडा रसिक उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

कर्जत तालुका कबड्डी असोसिएशनच्या वतीने पहिल्या कर्जत कबड्डी लीग २०२२ स्पर्धेचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानात करण्यात आले आहे. माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, माजी सभापती प्रदीप ठाकरे, माजी नगराध्यक्ष शरद लाड, विजय हांडे, सागर भोईर, सुमित भोईर, शरद बडेकर, सतीश श्रीखंडे, वैभव जगताप, संतोष पाटील, प्रथमेश मोरे, राजू वाघरे आदी उपस्थित होते.

कर्जत तालुका कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मधुकर घारे, समीर एरूणकर, काशीनाथ शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत व सत्कार केला. यावेळी विशेष उपस्थित असलेल्या अर्जुन पुरस्कार सन्मानित शांताराम जाधव, भावसार, छत्रपती पुरस्कार सन्मानित गणेश शेट्टी आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी पंच शरद कदम यांचा असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. सलामीच्या सामन्याचा मान रायगड वरीयर्स विरुद्ध लक्ष मेडिकल अँड वेदांत ५०१ वरीयर्स यांना मिळाला. पंचाची कामगिरी आंतरराष्ट्रीय पंच रवींद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली के. जी. म्हात्रे, पुरुषोत्तम पिंगळे, दशरथ पाटील, दिलीप वेखंडे, जयराम उघडे आदी सांभाळत आहेत.



# नव्या माथेरानची नवी उमेद

**दै.रायगड नगरी । माथेरान**




थंड वाऱ्याचा शहरा, लाल मातीचा रांगडा सुगंध, हिरवा शालू पांघरलेली डोंगररांग, गर्द वनराई, घोड्यांच्या टापांचा आवाज, या वर्णनावरून साहजिकच आपल्या डोळ्यासमोर एक चित्र उभं राहिलं असेल ते म्हणजे महाराष्ट्रातील थंड हवेचे सुप्रसिद्ध ठिकाण म्हणजे माथेरान,जवळपास तीन हजार फुटांवर समुद्रसपाटीपासून ८०३ मीटर उंचीवरील एक नयनरम्य ठिकाण म्हणजे अर्थातच आपले माथेरान २१ मे म्हणजे माथेरानचा वाढदिवस १७२ वर्षानंतर नव्या माथेरानची नवी उमेद घेऊन पर्यटकांचे केंद्र बिंदू ठरणार.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण म्हणजे आपले माथेरान २१ मे १८५० मध्ये ह्या सुंदर अश्या पर्यटनस्थळाचा शोध एका ब्रिटिश अधिकाऱ्याने लावला त्यांचे नाव एच.पी.मॅलेट.हे एच.पी.मॅलेट त्या वेळचे ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर होते. त्यावेळेस मॅलेट हे चौक गावाहून पायवाटेने वन ट्री हिल पॉईंट येथून माथेरानला आले आणि जातेवेळी ते रामबाग पॉईंट येथून पायवाटेने खाली उतरून पुन्हा चौक गावाकडे गेले. या दोन्ही पायवाटा अजूनही अस्तित्वात आहेत. असा हा एक ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या ठिकाणी ब्रिटिश काळीन हॅरिटेज वास्तू आजही ऐटीत उभ्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने येथील ब्रिटिशकाळीन बंगले, हॅरिटेज कपाडिया मार्केट, १८९७ सालचे करसनदास मूळजी ग्रंथालय या वास्तू आजही आपली छाप सोडत आहेत. याच बरोबर येथील प्रमुख आकर्षण म्हणजे येथील छोटी झुक झुक गाडी म्हणजेच येथील मिनिट्रेन. डोंगर दर्याच्या नागमोडी वळणाची खडतर आव्हाने पेलून मोठ्या दिमाखात माथेरान मध्ये असंख्य पर्यटकांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी झटत असते. त्यावेळेस सन १९०७ साली सर आदमजी पिरभाई आणि अब्दुल हुसेन आदमजी पिरभाई या पितापुत्रांच्या अथक परिश्रमातून आणि स्वखर्चाने रेल्वे प्रशासनाला लोकार्पण केलेली आहे. याच गाडीतून निसर्गाच्या अलौकिक सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी देश विदेशातील पर्यटक हजेरी लावतात.

नेरळ ते माथेरान असा उभा डोंगर पार करतांना जवळपास अडीच हजार फूट उंचीवर दोनशे दहा नागमोडी वळणे घेत ही छोटीगाडी माथेरानला येते. इथे आल्यावर घोडा आणि हात रिक्षेतून फेरफटका मारताना पर्यटकांना एका वेगळ्याच दुनियेत आल्याचा भास निर्माण होतो.माथेरान मधील मुख्य पाच, सात आणि बारा पॉईंट्स वरील देखावे मनाला भुरळ घालतात.

पाच पॉईंट्स मधील एको, लँड स्केप, हनिमून, मलंग आणि लुईझा पॉईंट्स आणि सात पॉईंट्स मधील अलेक्झांडर, रामबाग, लिटिल चौक, बिग चौक, वन ट्री हिल, बेलव्हिडियर हे मुख्य पॉइंट्स पाहण्यासारखे आहेत. त्यातच गर्दझाडी मध्ये दडलेला शारलोट लेक हा नेहमीच पर्यटकांना साद घालत असतो. येथील ग्रामस्थांचे स्वयंभु देवस्थान पिसारनाथ महाराज मंदिर आहे.इथे प्रत्येक मंगळवारी भाविकांची गर्दी असते.याच लेक जवळ लॉर्ड पॉईंट वरून अन्य काही पॉईंट्स प्रमाणेच दुर्बिणीतून समोरच्या डोंगरावरील नयनरम्य देखावे पाहता येतात. गा–वात माफक दरात घरगुती लॉजिंग तसेच पन्नास पेक्षाही अधिक हॉटेल्स मध्ये राहण्याची सोय उपलब्ध आहे. इथले नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी निदान दोन दिवसांच्या मुक्कामी राहणे आवश्यक आहे. आणि त्याच बरोबर येथे एकदिवसीय पर्यटकांची तर बाराही महिने गर्दी असते. इतर पर्यटनस्थळांच्या तुलनेत माथेरान अगदी स्वस्त असून मुंबई–पुण्या पासून दोन तासांच्या अंतरावर आहे. त्यामुळे सगळेच मुंबईकर आणि पुणेकर पर्यटनासाठी माथेरानला अधिकाधिक पसंती देत आहेत. आत्ता तर उन्हाळी पर्यटन हंगाम देखील जोरात सुरू आहे. यामध्ये काही पॉईंट्स देखील नव्याने सजलेले दिसत आहेत यामध्ये बिग चौक पॉईंट, वन ट्री हिल, मलंग, हनिमून, इको पॉईंट अश्या काही महत्त्वाच्या पॉईंटनी सुद्धा लाल जांभ्या दगडाचा नवीन लुक परिधान केलेला दिसत आहे. तसेच येथील पॉईंटचा राजा समजला जाणारा पॅनोरमा पॉईंट सुध्दा नवा लुक घेऊन पर्यटकांसाठी सज्ज झालेला दिसत आहे.

हे सगळे नवीन बदल येणाऱ्या पर्यटकांना अधिक आकर्षित करीत आहेत. आणि आत्ता वातावरणात सुरू असलेल्या बदला मुळे येथील थंडीच्या दिवसात इथले गारठ्याचे प्रमाण सुध्दा चांगलेच वाढत असून जानेवारी महिन्यात गारठ्याचे प्रमाण १३ अंश सेल्सिअस पर्यंत असल्याने अनेकदा इथे हिमकण पडतात की काय असाही भास इथल्या थंड वातावरणात डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात जाणवतो. वर्षाच्या शेवटी इथे पर्यटकांची मंदियाळी असते, शनिवार आणि रविवारी म्हणजेच विकेंड मध्ये इथे पर्यटकांची संख्या जास्त असते.आणि एकदा आपले माथेरान पाहिल्यावर पुन्हा पुन्हा इकडे येण्यासाठी आपसूकच पाऊले वळतात यात शंका नाही.

मुंबई पुण्याहून ट्रेनने नेरळ रेल्वे स्थानकात उतरून टॅक्सीने माथेरानला जाता येते. नेरळवरून अनेक पर्यटक पायी देखील निसर्गाचा आनंद घेत माथेरान गाठतात. माथेरानमध्ये अनेक पॉईंट्स आहेत. इको पॉईंट, मंकी पॉईंट, हनिमून पॉईंट, सिलिया पॉईंट, सनसेट पॉईंट, मॅलेट पॉईंट, पॅनोरमा पॉईंट, खंडाळा पॉईंट, अलेक्सझंडेर पॉईंट, रामबाग पॉईंट, मायरा पॉईंट, हार्ट पॉईंट असे अनेक पॉईंट फिरण्यासारखे आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पालीत सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा

खूप त्रास होतो. एकवेळ पुरुष मंडळी कुठेतरी निभावून घेतात मात्र वृद्ध व स्त्रियांचे तर खूपच हाल होतात. आदिवासी व्यवसायिक महिला यांचे तर स्वछताग्रहा अभावी प्रचंड हाल होतात, तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था महिलांची होते. पालीत बल्लाळेश्वर देवस्थानच्या वतीने भक्तनिवास क्रमांक १ जवळ स्वच्छतागृह व मुतारी आहे. मात्र भाविकांसाठी ते बनविले आहेत. भाविकांबरोबरच जवळचे काही लोक व व्यवसायिक त्यांचा वापर करतात. मात्र त्यांचा वापर पादचारी व इतर लोकांना शक्य नाही आणि त्यांची निर्मिती देखील त्या उद्देशाने केलेली नाही. अटीतटीच्या वेळी काही लोक पूर्वी अस्तित्वात असलेल्या बस स्थानकातील स्वच्छतागृहाच उपयोग करीत होते. मात्र आता हे बसस्थानक देखील तोडले आहे. पालीत दर्ग्यानजीक असलेल्या स्वच्छता गृहांची तर प्रचंड दुरावस्था झाली आहे. त्याची सुधारणा केल्यास त्याचा वापर होण्यासारखे आहे. पालीत ठराविक ठिकाणी स्त्रिया व पुरुषांसाठी मुताऱ्या स्वच्छतागृह असणे ही अतिशय महत्त्वाची गरज निर्माण झाली आहे. जेव्हा पालीत येतो तेव्हा स्वच्छतागृहाआभावी नेहमीच गैरसोय होते. आजारी माणूस किंवा स्त्रियांची देखील त्यामुळे मोठी परवड होते. किमान मोक्याच्या ठिकाणी तरी सार्वजनिक मुतारी किंवा स्वच्छतागृह असणे गरजेचे आहे. असे संदीप पाटील, बोकडविरा या पर्यटकांनी सांगितले.

## आंबेनळी घाटाचे म्हणजेच फिटझगेराल्डचे रूंदीकरण होण्याची गरज

दुरूस्त करण्यात आला. सद्यस्थितीत महाबळेश्वरपर्यतचा रस्ता काही ठिकाणी अरूंद तसेच काही प्रमाणात वाहतुकीस धोकादायक असूनही एस.टी.बसेस, जीप आणि अन्य वाहनांची वाहतूक सुरू आहे. मात्र, पावसाळयामध्ये पुन्हा या घाटरस्त्याला धोका निर्माण होणार असल्याने या घाटरस्त्याचे रूंदीकरण करण्याची गरज आहे. केंद्रीय भुपृष्ठ वाहतुकमंत्री ना.नितीन गडकरी यांनी करंजाडी रेल्वे स्थानकापासून विन्हेरे काटेतळी पोलादपूरमार्गे महाबळेश्वरपर्यंतचा राष्ट्रीय महामार्ग प्रस्तावित करून आंबेनळी घाटाचे म्हणजेच फिटझगेराल्डचे रूंदीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे. यामुळे या मार्गावरून पर्यटन विकास तसेच ऐतिहासिक दर्शन साध्य होणार आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जडण घडणीत रणरागिणीची भूमिका महत्वाची : सुनील तटकरे

कालावधीपासून सद्यस्थितीत महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकारणाला छेद देण्याचे काम काही ठराविक घटकांकडून केले जात आहे . राष्ट्रवादीच्या पक्षप्रमुखा विषयी चुकीची टीकाटिप्पणी केली जात आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीला लाजवेल असे बरेच काही मंडळींकडून केले जात आहे. दर्जाहीन वक्तव्य व टीका टिप्पणी केली जात आहे या बाबीचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा कडून मी निषेध नोंदवतो . आगामी काळातील निवडणुकीच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील सर्व महिला पदाधिकाऱ्यांना खासदार सुनील तटकरे यांनी मार्मिक मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी पक्ष वाढीसाठी आपण सर्वांनी सर्वकष सर्वतोपरी प्रयत्न करू असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

सदरच्या राष्ट्रवादी पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीसाठी राष्ट्रवादी कोकण विभाग अध्यक्ष अर्चना घारे, राष्ट्रवादी महिला रायगड जिल्हा अध्यक्ष उमा मुंडे, राष्ट्रवादी युवती जिल्हाध्यक्ष सायली दळवी तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व महिला तालुकाध्यक्ष युवती अध्यक्ष व इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## केंद्र सरकारच्या विरोधात रायगड जिल्हा राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने आंदोलन

पेण शहराध्यक्ष सुचिता चव्हाण, मुरुड शहराध्यक्षा प्रतिभा माळी, महाड शहराध्यक्ष जानवी विचारे, खोपोली शहराध्यक्ष सुवर्णा मोरे, वसांबे विभागीय अध्यक्षा वर्षा पाटील, पंचायत समिती वसांबे अध्यक्षा माया खाणे, मुस्कान झटाम, वंदना थोरवे आदी उपस्थित होत्या.

## कांदळवनांवरील अनधिकृत भरावांविरोधात कोळी समाजाचा एल्गार

प्रतिक कणगी व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामपंचायत बोर्ली पंचक्रोशीतील कोलमांडला ताराबंदर येथील ग्रामस्थांनी पोलीसांत आता पर्यंत अनेकवेळी तक्रार अर्ज दिले आहेत. यामध्ये बोर्ली – ताराबंदर खडतील , समुद्रकिनारी स्थित असलेल्या शासकिय कांदळवनात काही समाजकंटकांकडून रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत मोठ्या प्रमाणावर कांदळवनात माती , दगड , मुरूम इ.चा बेकायदेशीरपणे भराव टाकून कांदळवनाच्या झाडांची कत्तल करित आहेत. सदर बेकायदेशीर काम त्वरित बंद करावे. कांदळवनाचे संवर्धन करणे ही सर्वांची नैतिक जबाबदारी आहे .या बेकायदेशीर स्थगिती आणावी तसेच या गैरप्रकरणी ग्रुप ग्रामपंचायन बोर्ली, पोलीस प्रशासन , महसूल विभाग , वन विभाग , कांदळवन जिल्हाधिकारी रायगड यांनी कार्यवाही करावी. अशी मागणी महादेव कोळी समाजाने केली आहे.

तक्रार पत्रात नमूद केल्याप्रमाणे रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन मौजे कोलमांडला गट क्रमांक ४९ येथे हे सर्व अनधिकृत कामे केली जात आहेत . सदर तक्रार दिल्याच्या दिवशी म्हणजेच दि .१० / ०५ / २०२२ व दि . ११/०५/२०२२ या दोन दिवसांत शेकडो झाडांची कत्तल झाली आहे तसेच अतिक्रमणही चालूच आहे . यामुळे ग्रामस्थांमध्ये आक्रोशाचे वातावरण आहे . गावक–यांचा आक्रोश लक्षात घेता हे अनधिकृत कामे अशीच चालू राहिली तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणून आपण त्वरित या प्रकरणात लक्ष देऊन संबंधित दोषींवर कार्यवाही करावी अशी विनंतीही रेवदंडा पोलीसांना करण्यांत आली आहे.

# भानंग ग्रामपंचायतीत अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचा ग्रामसभेचा ठराव मंजूर

**दै.रायगड नगरी । तळा**



१ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून झालेल्या ग्रामसभेत भानंग ग्रामपंचायत हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचा ग्रामसभेचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे.१९ मे रोजी झालेल्या या सभेसाठी भानंग ग्रामपंचायतीचे सरपंच रघुनाथ वाघरे, उपसरपंच सौ.सुहानी भौड, सदस्य नाना दळवी, लक्ष्मण काते, सौ.सुलोचना रेवाळे, सुप्रिया पागार, कृषी मंडळ अधिकारी सागर वाडकर, कृषी पर्यवेक्षक प्रताप कदम,वरिष्ठ लिपिक दिलीप पाटील, ग्रामसेवक खंडू काळे, पत्रकार संजय रिकामे, जिल्हा शांतता कमेटी सदस्य दामोदर काते पंचक्रोशीतील ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होत

विनापरवानगी बांधण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामांमुळे गावातील नागरिकांना अडचणी निर्माण होऊन गावाला बकाल स्वरुप प्राप्त होते हे लक्षात घेऊन भानंग ग्रामपंचायतीने १९ मे रोजी घेतलेल्या ग्रामसभेत स्वार्थी वृत्तीने अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला. या पूर्वी अनधिकृत केलेल्या बांधकामांवर कारवाई करण्यात येईलच व अनधिकृत बांधकामे सुरू असल्याचे आढळल्यास धडक कारवाई करण्याचे निर्देश यावेळी सरपंच रघुनाथ वाघरे यांनी दिले.

गाव पातळीवर अनधिकृत बांधकामांना अभय देण्याचे काम स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फतच केले जाते. व्होट बँकेसाठी चालणार हे राजकारण संविधानापेक्षा मोठे नसल्यानेच कायद्यानेच त्यांना हतबल करणे योग्य ठरते भानंग ग्रामपंचायतीमध्ये मंजूर झालेल्या या ठरवामुळे अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर ग्रामपंचायत मार्फत कारवाई होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून या ठरावामुळे अनधिकृत बांधकाम करून मनमानी करणाऱ्यांना आता चाप बसणार आहे. या ठरावाचे सर्वांनी स्वागतच केले.

ग्रामसभेला लोकनियुक्त सरपंच रघुनाथ वाघरे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभेला सुरवात करण्यात आली ग्रामसेवक खंडू काळे, पत्रकार संजय रिकामे यांनी १ मे महाराष्ट्र दिनाचे महत्व सांगितले या ग्रामसभेत सन २०२१–२२ च्या जमाखर्चाचे वाचन करण्यात आले गावातील विविध विकास कामाबद्दल चर्चा, भानंग पाणीपुरवठा अंतर्गत वावे धरण वरून पाणी पुरवठा योजने संदर्भात चर्चा, घनकचरा व्यवस्थापन योजनेविषयी चर्चा, वृक्षलागवड संदर्भात चर्चा, महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभार्थी निवड, sc/st बंधुसाठी घरकुल योजना, १५ वा वित्त आयोगाचा निधी खर्च करण्याविषयी चर्चा,१० टक्के महिला बालकल्याण वर खर्च,१५ टक्के sc - st बंधुसाठी खर्च, ५ टक्के दिव्यांग खर्च यांवर चर्चा, महिला सबलीकरण वर चर्चा, पाणलोट समिती निवड,आयत्या वेळचे विषयावर चर्चा कृषीअधिकरी यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली, तसेच आरोग्यसेवक यांनी माहिती दिली. अश्या अनेक विषयांवर एकमताने ठराव आज ह्या ग्रामसभेत पारित झाले.

# सर्वे येथे शेतकऱ्यांना भात बियाणे वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना शेतबांधावर बियाणे वाटप कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुका कृषी विभाग व काशिद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने काशिद ग्रामपंचायत हद्दीतील शेतकरी बांधवांना भात बियाणे वाटप करण्यात आले.

काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे, चिकणी व काशिद येथील शेतकऱ्यांना सुवर्णा, चिंटू, रूपाली, शुभांगी, इत्यादी वाणाचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमा करिता ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार खेडेकर, उपसरपंच मयुरी नितेश धार्वे, तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ मंडळ कृषी अधिकारी व्ही.डी. आहिरे, कृषिमित्र सुशील खोपकर, कृषी सहायक ए. ए. चौलकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष राणे, विलास मोरे, अंकुश चाचे, वर्षा दिवेकर, जान्हवी दिवेकर, शुभ्रा कासार, तुळसा पवार, नीलम महाडिक, ग्रामसेवक अविनाश पिंपळकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

तसेच कृषी सहायक आदिराज चौलकर यांनी उपस्थितांना भात बियाणे उगवण क्षमता चाचणी, भात बियाण्यास मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया , बुरशीनाशकांची प्रक्रिया व जिवाणू संवर्धकांची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले.

काशिद ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना ग्रामपंचायत काशिद कडून सवलतीच्या दरात सुधारित बियाणे वाटप करण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आईसह मुलगा बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आईसह मुलगा राहत्या घरातून करंजाडे येथून कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ते दोघे हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. सौ.आरोही उर्फ पूजा अमोल गोंधळी (वय २५) व तिचा मुलगा मिहीत (वय ३) राहणार सेक्टर ३ करंजाडे येथून बेपत्ता झाले आहेत. सौ आरोही हिची ऊंची ५.३ इंच बांधा मध्यम, वर्ण गोरा, चेहरा गोल, नाक जाड व कानात वाली, उजव्या हाताच्या मनगटावर अमोल हे नाव गोंदलेले आहे सोबत लाल रंगाची पर्स व लाल रंगाची ट्रॅव्हलर बॅग आहे तर पायात ब्राऊन रंगाची सँडल व सोबत मोबाइल फोन आहे. तर मिहिर याचा वर्ण सावळा, चेहरा गोल, बांधा मध्यम, केस काळे आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोहवा रामचंद्र घागरे यांच्याशी संपर्क साधावा.

## मुख्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त शपथ




**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त महानगरपालिकेच्या मुख्यालयात दहशतवाद व हिंसा-चार विरोधातील शपथ घेण्यात आली. सदर कार्यक्रमास जनसंपर्क विभाग प्रमुख कांतीलाल पाडवी, सामान्य विभाग प्रमुख दशरथ भंडारी,आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड ,प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे,पालिका अधिकारी हरिश्चंद्र कडू, रमेश पाटील, हरेश जाधव,कर्मचारी उपस्थित होते.

## नगरपरिषदमध्ये दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आज २१मे रोजी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसा निमित्त कर्जत नगर परिषदेमध्ये शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत नगरपरिषद कार्यालयामध्ये दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून शपथ घेण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, बांधकाम विभाग मधील रवींद्र लाड, डी. के.गायकवाड, विलास गायकवाड, सुदेश गायकवाड, मुकेश परदेशी उपस्थित होते.



## तालुका काँग्रेसच्या वतीने स्व.राजीव गांधी यांना विनम्र अभिवादन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका काँग्रेस कमिटी तर्फे आज भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या वेळी त्यांना विनम्र अभवादन करण्यात आले. आमराई मधील आशीर्वाद सभागृहात समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी कर्जत तालुका काँग्रेस अध्यक्ष मुकेश सुर्वे, माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड, माजी उपनगराध्यक्ष संजय सुर्वे, कर्जत शहर काँग्रेस सरचिटणीस सुभाष मदन, अनंत देवळे, संदीप पाटील, सुप्रिया देशमुख, सुजाता सावंत, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना मुकेश सुर्वे यांनी, 'राजीव गांधींमुळे आधुनिक भारत झाला आहे. सध्या संगणक, मोबाईल, एटीएम आपण सर्रास वापरतो ती साधने आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

डिजिटल इंडियाचे स्वप्न त्यांचे होते.' असे स्पष्ट केले. सुभाष मदन आणि अनंत देवळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## पावसाची चाहूल, शेतकरी शेतीच्या कामात गर्क

**दै.रायगड नगरी । उरण**

पावसाची चाहूल लागल्याने उरण तालुक्यातील शेतकर्‍यांनी शेतीच्या मशागतीची , बांधबंदिस्तीची कामे उरकून घेण्यास सुरुवात केली आहे.

गुरांढोरांसाठी आवश्यक असणारा चारा साठवून ठेवण्याची तसेच गुहिणीनी पापड, लोणचे मसाला तयार करण्याची लगबग सुरू केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

यावर्षी पावसाचे आगमन हे लवकरच असल्याचा दावा हवामान खात्याने व्यक्त केला आहे.त्यामुळे उरण तालुक्यातील शेतकर्‍यांनी शेतीच्या मशागतीची, बांधबंदिस्तीची कामे उरकून घेण्यास सुरुवात केली आहे.तसेच घरावरील पत्र्याची, कौलांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेतले आहे.तर गुहिणीनी पापड, लोणचे मसाला तयार करुन साठवून ठेवण्याची लगबग सुरु केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# माथेरानमधील मुख्य रस्त्यावरील मलनिस्सारण समस्या मार्गी लागणार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील मुख्य रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक रस्त्यांची कामे एमएमआरडीए च्या माध्यमातून सुरू आहेत परंतु ही कामे पूर्ण करतांना याच रस्त्याच्या खालून मुख्य बाजारपेठेतील रेस्टॉरंट, हॉटेलधारक व घरांच्या मलनिस्सारण पाईप लाईन जोडलेल्या आहेत. ह्या रस्त्याची कामे करताना जर का सद्यस्थितीत या महत्वपूर्ण समस्यांवर तोडगा काढला गेला नाही तर भविष्यात रस्त्यांची खोदाई होऊन रस्त्यांची दुर्दशा होऊ शकते ही बाब ओळखून काँग्रेसचे शहर अध्यक्ष मनोज खेडकर यांनी दि. २० मे रोजी कर्जत खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे यांची कर्जत येथे भेट घेतली. त्यांचेशी माथेरानमधील एम.एम. आर.डी.ए.च्या चालु असलेल्या मुख्य रस्त्याच्या कामाविषयी चर्चा केली. मा. आमदारांना मुख्य बाजारपेठेतील रेस्टॉरंट, हॉटेलधारक व घरांच्या मलनिस्सारण समस्यांविषयी सविस्तर माहीती



दिली. आमदारांनी त्वरीत सदर प्रकल्पावरील एम.एम.आर.डी.ए.चे कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांना सदर ड्रेनेज लाईनचे अंदाजपत्रक बनविण्यास सांगीतले व या चालु प्रकल्पामध्येच सदर ड्रेनेज लाईनचे काम करण्यास सुचना केली आहे. त्यामुळे येणार्या काळात जेव्हा नगरपरिषदेचा प्रस्तावित मलनिस्सारण प्रक्रीया प्रकल्प (ड्शुरसश ढीशरींशर्पी झश्ररपीं) हाती घेण्यात येईल तेव्हा हा रस्ता या ड्रेनेजलाईन साठी खोदावा लागणार नाही. टपालपेटी नाका ते लक्ष्मी हॉटेल या भागात क्ले पेव्हर लावण्याचे कामावर एम.एम.आर.डी.ए. अंदाजे ८ ते १० कोटी रुपये खर्च करेल. एवढा मोठा निधी पुन्हा लगेच या कामासाठी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे ज्या त्रुटी राहील्या आहेत त्या दुरुस्त करणे आवश्यक आहेत.

सध्या या रस्त्याच्या दुतर्फा असलेले रेस्टॉरंट, हॉटेल आणि घरे यांचे ड्रेनेज व सेफ्टी टँक ओव्हरफ्लो हे अनेक ठिकाणी पावसाळी पाणी वाहुन नेण्याच्या गटारांमधे सोडले आहे.मागील अतिवृष्टीमधे मधुमालती हॉटेल समोरील या गटारात सिवेजचे अनेक पाईप असल्यामुळे पाणी रेल्वे ट्रॅकने वाहत मोहल्लयामधे अनेक घरात घुसले व नागरीकांचे हाल झाले होते. मैला वाहुन नेणारी स्वतंत्र व्यवस्था तयार झाल्यावर सांडपाणी हे पावसाचे पाणी वाहुन नेणार्या गटारात जाणार नाही. त्यामुळे मुख्य रस्ता हा दुर्गंधी मुक्त होईल. सुशोभीकरणात 'ड्रेनेज सिस्टीम' योग्य असणे अत्यंत आवश्यक आहे. असेही मनोज खेडकर यांनी निदर्शनास आणून दिले.

सत्तेत नसताना सुध्दा केवळ गावाचे हीत जपत आणि ज्यांनी ही कामे कशा पद्धतीने पूर्ण झाली पाहिजे ही नैतिक जबाबदारी होती परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे विशेष करून नगरपरिषदेला याच मलनिस्सारण प्रकल्पाकामी आगामी काळात रस्त्यांची खोदाई करण्यासाठी आर्थिक झळ सोसावी लागू नये. यातूनच नगरपरिषदेच्या तिजोरीवर सुध्दा भुर्दंड येण्याची शक्यता होती ती दूर करण्यासाठी मनोज खेडकर यांनी पुढाकार घेऊन ती मार्गी लावण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. याबाबत आमदारांनी सुध्दा माथेरानच्या विकास कामी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचे काँग्रेसचे शहर अध्यक्ष तथा पर्यावरण विभाग रायगड जिल्हा अध्यक्ष मनोज खेडकर यांनी अभिनंदन केले.

# उरण नगर परिषदेची २३ कोटींची पाणी थकबाकी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपरिषदे कडेही मार्च २०२२ अखेर पर्यंत विविध दंडासह एम आय डी सी ची पाणी देयकाची २३ कोटी १३ लाख ८१ हजार ९५४ रुपये थकबाकी असल्याची माहिती एमआय डी सी चे उपभियांता रवींद्र चौधरी यांनी दिली .


उरण नगर एमआयडीसीच्या रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जात आहे.शहरातील सुमारे ३० हजार लोकसंख्येसाठी ३५०० क्युमी पाणीपुरवठ्यासाठी एमआयडीसीकडून तीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. या तीन जोडण्यांपैकी जोडणी क्रमांक-१- १९ कोटी २९ लाख ०३ हजार ४०६, जोडणी क्रमांक- २-एक कोटी ४१ लाख ९९ हजार ०५३, तर जोडणी क्रमांक ३ - दोन कोटी ४२ लाख ७९ हजार ४९५ अशा तिन्ही जोडण्या मिळून उनपकडे एमआयडीसीची परिषदेला विविध प्रकारच्या दंडांसह एकूण २३ कोटी १३ लाख ८१ हजार ९५४ रुपये थकबाकी असल्याची माहिती एमआयडीसी उरणचे उपअभियंता रवींद्र चौधरी यांनी दिली.

पाणी बिलांच्या थकबाकी वसुलीसाठी नियमितपणे नोटिसा बजावल्या जातात. मात्र त्यानंतरही थकबाकी भरण्यासाठी विलंब होतोच. उनपसह तालुक्यातील १९ ग्रामपंचायतींकडे असलेल्या एकूणच पाणी बिलांच्या ४९ कोटी ४८ लाख ४१ हजार ६६७ रुपयांच्या थकबाकीमुळे मात्र एमआयडीसीच्या विकासकामांना पुरती खीळ बसली आहे. कोट्यवधींच्या थकबाकीमुळे मुं पाणीपुरवठ्यावरही विपरीत परिणाम होत असल्याची माहितीही पो एमआयडीसीकडून देण्यात आली आहे. एकूण थकबाकीचा आकडा २३ कोटी १३ लाख ८१ हजार ९५४ रुपयांपर्यंत वाढला असल्याची माहिती उरण मुख्याधिकारी संतोष टो माळी यांनी दिली आहे.

# काशीद-बीचवर मे महिन्याच्या तिसऱ्या विकेंडला पर्यटकांची तोबा गर्दी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पर्यटनात जगाच्या पटलावर नावारूपाला आलेल्या मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर मे महिना तिसऱ्या विकेंडला आज रविवारी पर्यटकांची गर्दी पाहावयास मिळाली. वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झा-लेले पर्यटकांनी समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला.



काशिद-बिच समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते.पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, पॅरॅसेलिंगबोट,बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते. याचा पर्यटक मनसोक्त आनंद लुटत होते. याठिकाणी विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅमलाही सामोरे जावे लागते. देश-विदेशातील पर्यटक देखील आवर्जून भेट देत असतात. यामुळे काशिदबीचला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.मे महिन्यात विकेंड ला रविवारी सकाळच्या वेळी ढगाळ वातावरण नंतर दुपारी प्रचंड उकाड्यामुळे पर्यटकांनी काशिद बीच वर पोहण्याचा मनसोक्त आनंद लुटला!

# पनवेल जवळील एक्सप्रेस वेवर झालेल्या दोन वाहनांच्या अपघातात तिघे जण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवेवर मुंबई-पुणे हायवे लेन नं ०१ वर ११ किमीच्या जवळ दोन वाहनात झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

सचिन बिडवई (वय ४७) हे त्यांच्या ताब्यातील रेनॉल्ड कायगर गाडी क्रमांक एमएच १२ टीएस ३०८७ ही खारघर येथून पुणे येथे घेऊन जात असताना मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवेवर मुंबई-पुणे हायवे लेन नं ०१ वर ११ किमीच्या जवळ पाठीमागून येणारी हुंडयाई वेन्यू गाडी क्रमांक एम एच ०५ ईजे ५५६५ वरील चालक धिरज छाब्रिया (वय २४) याने त्यांच्या गाडीला पाठीमागून ठोकर मारून अपघात करून अपघातामध्ये सचिन बिडवई यांची गाडी डिव्हायडरला घासली तसेच धिरज छाब्रिया याची गाडी दुसऱ्या लेनवर जाऊन पलटी होऊन झालेल्या अपघातामध्ये सचिन बिडवई, त्यांची पत्नी रूपाली बिवडई व दीक्षा छाब्रिया हे जखमी झाले आहेत. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून याची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

श्री.मुजावर सो.कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.शिवराज राणे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५४४/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१६/०६/२०२२

**कै.मीना विश्वास साळवे मयत तर्फे वारसदार**

**१) श्री.विश्वास काशिनाथ साळवे**
वय : ६० वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा.सदनिका क्र.अ-१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८-३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६

**२) श्री.सुशिल विश्वास साळवे**
वय : ३१ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी (वाहन चालक)
रा.सदनिका क्र.अ-१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८-३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६

**३) श्री.अनुराग विश्वास साळवे**
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सिद्धार्थ कॉलनी, बी.डी.गायकवाड प्लॉट, डॉ.धवल शहाच्या मागे, चेंबुर, मुंबई-४०००७१

**४) सौ.सोनम मनजीत जेठ (विवाहित मुलगी)**
**पुर्वाश्रमीची कु.सोनम विश्वास साळवे**
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.४, गल्ली नं.६ व ७ च्या जवळ, निवृत्ती कचरु अहिरे, प्लॉट नं.३७, सिद्धार्थ कॉलनी, के.एन.गायकवाड मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७१

**५) कु.दिपाली विश्वास साळवे**
वय : ३० वर्षे, धंदा : खाजगी नोकरी
रा.सदनिका क्र.अ-१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, भूखंड क्र.२८-३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर ६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै.मीना विश्वास साळवे** यांचा मृत्यू दि.०७/०७/२०१९ रोजी झाला. त्यांचे मृत्यूच्या पश्चात खालील वर्णन केलेल्या मिळकतीत त्यांच्या असलेल्या ५० टक्के हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता मे.पनवेल कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

१) **कै.मीना विश्वास साळवे** यांना त्यांच्या ५० टक्के हिश्श्यास असलेल्या मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणेचा आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.अ-१/१०२, (क्षेत्र ३४० चौ.फूट म्हणजेच ३१.५७ चौ.मी. बिल्टअप + ७७ चौ.फुट बाल्कनी) या आकारमानाची सदनिका क्र.अ-१/१०२, मिडलॅड को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, या ठिकाणी स्थित आहे. भूखंड क्र.२८-३०, वेंकट प्रेसिडेन्सी हॉटेलजवळ, सेक्टर-६ अ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

अर्जदार हे **कै.मीना विश्वास साळवे** यांचे वरील मिळकती संबंधात कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्कांबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार हे जर **कै.मीना विश्वास साळवे** यांच्या वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना सदर भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/ करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/ करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर (संचिका क्र. ०७) | ८७ | १०५/८ | ०-०८-७ | १०० चौ.मी. | मौजे-करंजाडे नोड, भूखंड क्र. १२७, सेक्टर-६, क्षेत्र-९९.३७ चौ.मी. | **मुळ भूधारक कै. हेमला बामा भिंगारकर यांचे वारस**<br>१) श्री. लहु हेमला भिंगारकर<br>२) श्री. भाऊ हेमला भिंगारकर<br>३) श्रीमती बेबीबाई विठ्ठल केणी<br>४) श्रीमती जनाबाई काना केणी | |
| | **एकूण संपादित क्षेत्र** | | | **०-०८-७** | | | | |
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| २ | तळोजा ३३३ | पेंधर १/ २००८ | २१६/२<br>२१८/१ब +३ब/२<br>२१८/३ | ०-०३-०<br>०-३३-०<br>०-३५-१ | ६०० चौ.मी. | भूखंड क्र. १२G, सेक्टर-२४, क्षेत्र ५९९.८७ चौ.मी. | **कै.कोळू आलू भोईर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. बाळकृष्ण कोळू भोईर<br>२) श्री. धर्मनाथ कोळू भोईर<br>३) श्री. प्रकाश कोळू भोईर<br>**४) कै. चंद्रकांत काळु भोईर (मयत) यांचे वारस**<br>४.१) श्रीमती मीनाक्षी चंद्रकांत भोईर<br>४.२) कु. ओमकार चंद्रकांत भोईर<br>**५) कै. प्रभाकर कोळु भोईर (मयत) यांचे वारस**<br>५.१) श्रीमती गुणाबाई प्रभाकर भोईर<br>५.२) श्री. मच्छिंद्रनाथ प्रभाकर भोईर<br>५.३) सौ. अनिता नरेश तोडेकर<br>५.४) सौ. वनिता राजेश ठाकुर<br>६) श्रीमती ताईबाई केशव उलवेकर<br>७) श्रीमती जिजाबाई धर्मा तोडेकर<br>८) श्रीमती पुष्पा परशुराम पाटील | निरंक |
| ३ | तळोजा ५५६+ ८९५ | पाचनंद २८२ | ६/३<br>६/४ | ०-१७-६<br>०-३७-७ | ५०० चौ.मी. | भूखंड क्र. १B, सेक्टर-४, क्षेत्र ४९९.६१ चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३६८३/२०२२ हे हक्कसोडपत्रानुसार<br>**सुफियान बशीर अहमद पटेल** | निरंक |
| ४ | तळोजा ४६४ | तळोजा पाचनंद ११ | २३६/१ | ०-२३-० | २०० चौ.मी. | भूखंड क्र. २२, सेक्टर-१७, क्षेत्र १९७.४६ चौ.मी. | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३६८३/२०२२ हे हक्कसोडपत्रानुसार<br>**१) सुफियान बशीर अहमद पटेल**<br>**२) फातीमा अब्दुल अजीज पटेल**<br>**३) झहुर अहमद अब्दुल अजीज पटेल** | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र/करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

सिडको/जनसंपर्क/०८१/२०२२-२३

